दिव्य वार्ता

## शरद पवारांचा प्रमुख शिलेदार शिवसेनेच्या वाटेवर ? नेत्याच्या वक्तव्यानं चर्चेला उधाण

मुंबई । दिव्य न्युज
लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं होतं, महायुतीमधील अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला, मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये मोठा उलटफेर पाहायला मिळाला, महायुतीनं जोरदार पुनरागमन केलं. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. तब्बल २३२ मतदार संघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले तर महाविकास आघाडीला अवघ्या ५० जागांवर समाधान मानावं लागलं.



दरम्यान विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीला गळती लागल्याचं पाहायला मिळत आहे, अनेक दिग्गज नेत्यांनी महायुतीमध्ये प्रवेश केला आहे. याचा सर्वाधिक फटका हा शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला बसला आहे. दरम्यान आता आणखी एक मोठा धक्का शरद पवार गटाला बसू शकतो अशी चर्चा सुरू आहे.

वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.०६ ऑगस्ट २०२५ पाने ४ किंमत ३

# ॲड.शफिक भाऊ यांच्या एकाच पत्रकाने प्रशासनाला घामच फुटले

## उपमुख्यमंत्रींना संग्राम जगताप विषयी प्रश्न विचारतात पोलिसांनी भाऊला केले नजरबंद



### मुस्लिमांच्या विरूध्दी वक्तव्य करणाऱ्यांना पोलिस कधी कारवाई करणार

### शफिक भाऊ यांच्यावर झालेल्या कारवाईचा प्रशासनाविरूध्द होत आहे निषेध

### त्या संग्राम जगतापवर कारवाई करा म्हणने हा शफिक भाऊचा अधिकारच आहे पण प्रशासनाची दुटप्पी भुमिकाचा निषेध –ईलियास टेलर

बीड । दिव्य न्युज
बीडमध्ये आज आणि उद्या राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्हयाचे पालकमंत्री यांचा दौरा आहे त्याच निमित्ताने एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफिक भाऊ यांनी एक पत्रक प्रसिध्दीस दिले त्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अहमदनगरचे आ.संग्राम जगताप हे गेल्या काही महिन्यापासून मुस्लिम समाजाच्या विरूध्द वचाळ भाषेत वक्तव्य करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे संग्राम जगताप यांच्या वक्तव्यामुळे परवाच पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यात यावत या गावी दोन समाजात तेढ निर्माण झाला होता अशा या आमदाराच्या विरूध्द अजित पवार का कारवाई करत नाही असा प्रश्न पत्रकात ॲड.शेख शफिक यांनी केला होता संग्राम जगताप यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी केली होती अजित पवार यांची भुमिका ही संग्राम जगताप यांच्याविषयी स्पष्ट नाही वारंवार संग्राम जगताप हे मुस्लीम समाजाचे भावना दुखविणारे वक्तव्य करत आहे म्हणून शफिक भाऊ यांनी तसे पत्रक काढून अजित पवार यांच्याकडे मागणी केली हा त्यांचा अधिकार आहे परंतु या पत्रकामुळे बीडच्या जिल्हा प्रशासनाला घामच फुटले बीडमध्ये दैनिकात बातमी प्रकाशीत होताच पोलिसांनी शफिक भाऊ यांना ठाण्यात बोलून त्यांच्या हातात नोटीस देऊन अजितपवार यांचा दौरा संपेपर्यंत त्यांना नजरकैदेत ठेवले आहे एकीकडे मुस्लीमावर वक्तव्य करणाऱ्यावर कारवाई होत नाही आणि दुसऱ्याकडे कारवाई करा म्हणून साधे पत्रक काढणारे शफिक भाऊवर पोलिस कारवाई करत आहे याचा जोरदार निषेध बीडमध्ये होत आहे. पोलिसांची झालेली एकतर्फी कारवाई हे निषेधार्थी असल्याचे पत्रक बीड नगरपालिकेचे माजी सभापती ईलियास टेलर यांनी केले आहे पोलिसांनी अगोदर आ.संग्राम जगताप यांच्यावर कारवाई करावी अशी ही मागणी त्यांनी केली असून राज्यभरातील आणि जिल्हयातील सर्व मुस्लिम समाजाची ही मागणी आहे. अजितपवार यांच्या दुटप्पी भुमिकामुळे मुस्लिम समाजात प्रचंड चिढ निर्माण झाली असून शफिक भाऊ यांच्यावर कारवाईचा सर्वस्तरातून निषेध होत आहे.

### अजित पवारांवर दबाव

उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड दौर्यावर येत असताना, त्यांच्यासमोर हा मुद्दा उपस्थित होण्याची शक्यता आहे. एमआयएम पक्षाने स्पष्टपणे मागणी केली आहे की, अजित पवार यांनी या प्रकरणी पक्षाची भूमिका जाहीर करावी आणि संग्राम जगताप यांच्यावर कारवाई करावी. शेख शफीक यांनी म्हटले, आम्ही अजित पवारांना थेट सवाल विचारणार आहोत. जर त्यांनी कारवाई केली नाही, तर याचा अर्थ ते या वक्तव्याला पाठिंबा देत आहेत, असा होईल.



बीड : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावणारे वक्तव्य केल्याने बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या वक्तव्यामुळे सामाजिक सलोखा धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत असून, एमआयएम पक्षाने अजित पवार यांच्याकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. आज उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौर्यावर येत असताना, मुस्लिम समाजाचे नेते त्यांना थेट सवाल करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मुस्लिम समाजात संताप

जगताप यांच्या वक्तव्याने बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे,तरी स्थानिक मुस्लिम नेते या मुद्द्यावर अजीत दादा जाब विचारतील का? का फक्त पत्रकबाजी, फक्त पत्र सोशल मीडिया टाकतील, का समोर बोलती हे पाहावं लागेल..

### वक्तव्यामुळे वादाची ठिणगी

संग्राम जगताप यांनी एका जाहीर कार्यक्रमात केलेल्या वक्तव्याने मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक भावना दुखावल्या आहेत. या वक्तव्याचा निषेध करताना एमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शेख शफीक यांनी प्रसिद्धीपत्रक जारी केले. त्यात त्यांनी म्हटले आहे, संग्राम जगताप यांनी उघडपणे समाजाचा अपमान केला आहे. अजित पवार यांनी जर खरोखर सर्व समाजाचे नेते असल्याचा दावा करत असतील, तर त्यांनी या वक्तव्याची सार्वजनिक निंदा करून जगताप यांच्यावर कठोर कारवाई करावी. आमची अपेक्षा आहे की, अजित पवार यांच्याकडून संग्राम जगताप यांच्या तोंडाला कुलूप लावले जाईल किंवा त्यांची पक्षातून हकालपट्टी होईल.

# अजितदादा, तुम्ही रोजच बीडला या !

## बीडकरांची मागणी : पवारांचा दौरा असलेले रस्ते, परिसर चकाचक, जिल्हा प्रशासनाची नियोजनासाठी धावपळ

बीड । दिव्य न्युज
राजकीय मोठे नेते, लोकप्रतिनिधी असे कोणी जिल्ह्यात येणार असले की, आठवड्यापासूनच जिल्हा प्रशासन कामाला लागते. ज्या भागात हे नेते जाणार असतात, त्या ठिकाणचा परिसर, रस्ते, स्वच्छता, पाणी सर्व सुविधा उपलब्ध केल्या जातात. एरव्ही मात्र, याकडे कोणीही लक्ष देत नाही. मूलभूत सुविधांसाठी अनेकदा मोर्चे, आंदोलने करण्यात आली, परंतु जिल्हा प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. आतादेखील उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांचा ७ ऑगस्ट रोजी दौरा नियोजित आहे. त्यानुषंगाने पालिका, पोलिस, जिल्हा प्रशासन धावपळ करत आहे. ज्या ठिकाणी पवारांचा दौरा आहे, त्या ठिकाणचे रस्ते, झाडे, स्वच्छता चकाचक करण्यात आले आहेत. त्यामुळे अजित दादा तुम्ही रोजच बीडमध्ये या.... अशी मागणी बीडकर करत आहेत.

बीड शहरात सध्या गल्लीपासून ते मुख्य चौकापर्यंत सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसतात. पाणी वेळेवर मिळत नाही. रस्त्यांवर खड्डे, दुभाजकांतील झाडांवर धूल झाली. रस्त्यांची कामे अर्धवट आहेत. अतिक्रमणे वाढली आहेत. यासह अनेक समस्या बीड शहरात आहेत. या मार्गी लावण्यासाठी आंदोलने केले, मोर्चे काढले, चिखलात लोटांगण घेतले. पण, प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. परंतु, उपमुख्यमंत्री अजित पवार हे एकच दिवस येणार असल्याने अखखे प्रशासन कामाला लागले आहे. ज्या परिसरात पवार जाणार आहेत, तो परिसर स्वच्छ आणि चकाचक केला जात आहे.



**डम्पिंग ग्राउंड केले स्वच्छ**

अजित पवार यांच्या हस्ते ७ ऑगस्ट रोजी बीड शहरातील श्री खंडेश्वरी देवी परिसरात १५ हजार वृक्ष लागवड केली जाणार आहे. ज्या मार्गावरून ते जाणार आहेत, त्याच मार्गावर मागील अनेक वर्षापासून पालिकेने केलेले अनधिकृत डम्पिंग ग्राउंड आता स्वच्छ केले जात आहे. विशेष म्हणजे ज्या रस्त्यावर हा कचरा आहे, तो मार्गच बदलण्याच्या हालचाली आहेत.






**मुख्य चौकातील खड्डे बुजवले**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपालिका या दरम्यान मोठ मोठे खड्डे पडले आहेत. मागील आठवड्यात याच खड्ड्यांच्या ठिकाणी ठाकरे गटाने आंदोलन केले होते. तरीही प्रशासनाने खड्डे बुजवले नव्हते. पण, गुरुवारी अजित पवार येणार असल्याने हे खड्डे बुजविण्यास सुरुवात झाली आहे.

# गडकरी विद्यार्थ्यांना चहावाले बनू नका असं का म्हणाले ?, पंतप्रधान मोदींवर टीका की..

नागपूर । दिव्य न्युज
भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेकदा आपल्या भाषणात आपण चहावाला असल्याचा उल्लेख करतात. चहावाला या देशाचा पंतप्रधान झाला, अशी चर्चा केवळ भारताच्या नाही तर जगाच्या राजकारणातही केली जाते. गायक अनुप जलोटा यांनी नुकतेच एका मुलाखतीतही भविष्यात चहावाला बनायला आवडेल ,असे मिश्किल उत्तर दिले होते. चहावाला पंतप्रधान यावरून विरोधकांनी अनेकदा टीकाही केली आहे. मात्र, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूमधील एका कार्यक्रमात विद्यार्थ्यांसमोर बोलताना चहाच्या दुकानाचा उल्लेख केला.ते काय म्हणाले पाहा.. गडकरी एका कार्यक्रमात म्हणाले की, शिक्षण ही आपली शक्ती आहे.

शिक्षण घेतल्याशिवाय कुठल्या समाजाचा विकास होऊ शकत नाही. आज अनेक लोक ट्रक ड्रायव्हर, चहाचे



दुकान ,अशी छोटी कामे करताना दिसतात. त्यांच्यामध्ये चांगले कला कौशल्य असूनही केवळ शिक्षणा अभावी ते मागे पडलेले आहेत. त्यामुळे सगळ्या भाषांचे शिक्षण घ्यावे ,असे आव्हान त्यांनी केले. शिक्षण घेत असताना पदवी अभ्यासक्रमात तुम्हाला खूप गुण मिळाले म्हणजे तुम्ही यशस्वी झाला , तसे नाही. मी विधी अभ्यासक्रमाला असताना मागच्या बाकावर बसणारे आज मोठे वकील झाले तर गुणवत्ता यादीत आले नाही असेही गडकरी म्हणाले.






# बनावट नोटा : दहशतवादविरोधी पथकाकडून कसून चौकशी सुरू

## मास्टरमाइंड फरार : सातही आरोपींची न्यायालयीन कोठडीत केली रवानगी

अहिल्यानगर । दिव्य न्युज
बनावट नोटाप्रकरणातील आरोपींची दहशतवादविरोधी पथकाकडून चौकशी करण्यात आली असून, या प्रकरणाचा दहशतवादी संघटनांशी संबंध आहे का?, याबाबत पथकाकडून तपास करण्यात येत असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. दरम्यान, याप्रकरणी अटकेत असलेल्या सातही आरोपींना सोमवारी न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.

बनावट नोटांचा तिसगाव (ता. छत्रपती संभाजीनगर) येथील कारखाना अहिल्यानगर तालुका पोलिसांनी शुक्रवारी (दि. १) उद्ध्वस्त केला. कारवाईदरम्यान ५० लाख ५० हजारांच्या बनावट नोटा, २ कोटी १६ लाख नोटांची छपाई होईल, असा कागद, प्रिंटर, स्कॅनर, आरोपींचे मोबाईल, असा एकूण ८८ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकूण सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. बनावट नोटा तयार करून वितरित करणारे मोठे रॅकेट सक्रिय होते. २०२१ पासून हा कारखाना सुरू होता. मुख्य सूत्रधार अंबादास रामभाऊ ससाणे (रा. शहरटाकळी, ता. शेवगाव) फरार आहे. दहशतवादविरोधी पथकाने या प्रकरणाची दखल घेतली आहे. या प्रकरणाचा दहशतवाद्यांशी संबंध आहे का?, याअनुषंगाने तपास करण्यात येत आहे. अटक केलेले आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. ससाणे याच्याविरोधात बनावट नोटाप्रकरणी यापूर्वीचे दोन गुन्हे दाखल आहेत. शिक्षा भोगत असताना त्याने बनावट नोटांचा कारखाना टाकण्याचा कट रचला होता. त्याला बनावट नोटा छापण्यासाठी शाई, कागद, प्रिंटर कुणी उपलब्ध करून दिले, याबाबत तपास करण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

आरोपी अरबट याला पश्चात्ताप
दरम्यान, यातील विनोद दामोधर अरबट (रा. सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर) याला संभाजीनगर येथून अटक करण्यात आलेली आहे. त्याने अटक झाली तेव्हापासून काहीही खाल्ले नाही.
त्याला गुन्हा केल्याचा पश्चाताप असून, त्याने कारवाईची धास्ती घेतली असल्याचे तपासी अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.




# जिल्हा परिषदेची शाळांची खस्ता हालत विद्यार्थी व शिक्षक जीव मुठीत घेऊन शिकवतात व विद्यार्थी शिकतात

## शाळा झाडाखाली भरतात तर जिथे इमारततीथे जीव मुठीत घेऊन विद्यार्थी शिकतात याला जबाबदार कोण?-अशोक येडे





बीड । दिव्य न्युज

बीड आम आदमी पार्टीच्या वतीने देशांमध्ये शिक्षणाचे स्थर सर्वात खालच्या दर्जाचे होत आहे व जिल्हा परिषदेच्या शाळा मोडकळीस आणून गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्याचा सरकारचा डाव उलथून टाकण्यासाठी व ज्या पद्धतीने राजस्थानमध्ये शाळेचे छत पडून विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला व पाठीमागे नागपूरमध्ये भिंत पडून विद्यार्थी मृत्युमुखी पडले त्याच पद्धतीने आपल्या बीड जिल्ह्यामध्ये व अजून कोठेही असा हासता होऊ नये म्हणून आम आदमी पार्टीच्या वतीने दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री व शिक्षा मंत्री माननीय मनीष सिसोदिया यांच्या आदेशाने संपूर्ण देशामध्ये शाळांची खस्ता हालत जनतेसमोर आणण्याचे काम आम आदमी पार्टी करत आहे हे करत असताना बीड जिल्ह्यातील शाळांची हालत खूप खस्ता आहे बीड पासून जवळच दहा किलोमीटर वरती असणारे वरवटी या गावच्या कोठुळे वस्ती तालुका जिल्हा बीड या ठिकाणची शाळा पाठीमागील २६ वर्षापासून झाडाखाली भरते त्याला कमरा नाही एक छोटासा शेड दिलेला आहे आणि त्या झाडाखाली शिक्षक आपलं कर्तव्य बजावताना दिसत आहे त्याचबरोबर बीड शहरापासूनच १२ १३ किलोमीटर वरती पिंपळवाडी रोड वरती भाळवणी या गावाजवळ वायकर वस्ती या ठिकाणी त्या शाळेवरती छताच नाही आणि झाडावर खाली काही मुले व काही मुले बिल्डिंगच्या बाजूला बसून शिक्षक शिकवत आहेत पाण्याची व्यवस्था नाही बाथरूमची व्यवस्था नाही जनावरे साईडला बांधलेली गवत डोक्यात उगवलेलं कोणीही त्याकडे बघायला तयार नाही येथून बीड पासून पाच किलोमीटर अंतरावर अंथरवण पिंपरी तांडा तालुका जिल्हा बीड या जिल्हा परिषदेच्या शाळेचे क्षत्रिय पाठीमागे तीन वर्षांपूर्वी पडलेला असून त्या पडलेल्या छतांमध्ये फरशी बसवण्यासाठी पैसे आले आणि चकचकीत नवीन फरशी बसवली गेली परंतु वरी छत तुटलेले दुरुस्त करण्यात आले नाही करण्यात आले नाही पंतप्रधानांची त्यावरती चकचकीत नवीन पाटी लावलेली स्वर्ण महोत्सव मार्बल मध्ये बोर्ड तीन लावण्यात आले आणि ती बिल्डिंग पडलेले आहे त्या पडक्या बिल्डिंगमध्ये शिक्षक आपला कर्तव्य निभवत आहेत व ऊसतोड कामगारांची लेकरं त्या तुटक्या शाळेमध्ये शिकत आहेत कधीही मोठा हात सांगू शकतो याला जबाबदार कोण हे सर्व जनतेसमोर व देशाच्या मालकासमोर आणण्याचे काम आम आदमी पार्टी करत आहे यावेळी या मोहिमेमध्ये माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी माऊली शिंदे जिल्हा बॉडी सदस्य कैलास चंद पालीवाल जिल्हा कोषाध्यक्ष सय्यद सादिक शहराध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभाग घेत आहे वही मोहीम अशी चालत राहणार आहे

# मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन-बीड जिल्हा कार्यकारिणी बैठक आणि पदाधिकारी मेळावा पार पडला!

बीड । दिव्य न्युज :

आज दिनांक ३ ऑगस्ट २०२५, रविवार रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात, मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन बीड जिल्हा कार्यकारिणीची बैठक आणि पदाधिकारी मेळावा जिल्हाध्यक्ष शेख रमिज अहमद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला गेल्या काही महिन्यांपूर्वी एक सर्वसामान्य कुटुंबातील युवकाला मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन चे संस्थापक सलीम सारंग साहेब यांनी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली त्या जबाबदारीला सार्थ ठरवत शेख रमिज अहेमद यांनी जिल्हाभर संघटन कौशल्याचे जीवावर मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या संघटन मजबूत करण्याचं काम केलं काल बीड रेस्ट हाऊस येथे जिल्हा पदाधिकारी नियुक्त करून आपलं संघटन कौशल्य दाखवून दिल

या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करून त्यांची असोसिएशनच्या विविध पदांवर पदनियुक्ती करण्यात आली. सामाजिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून परभणी जिल्हाध्यक्ष शेख सलीम उपस्थित होते. सर्व पदनियुक्त्या मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. सलीम सारंग साहेब यांच्या आदेशानुसार करण्यात आल्या. नियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. नियुक्त पदाधिकारी यांची यादी खालीलप्रमाणे: महिला जिल्हाध्यक्ष - हाफेज मसूर महिला शहराध्यक्ष - इकबाल हाफेज युवक जिल्हाध्यक्ष - शेख महेबुब




जिल्हा उपाध्यक्ष - शेख नवीद

महिला जिल्हाध्यक्ष - सरला ताई पवार

महिला जिल्हा कार्याध्यक्ष - प्रणिता ताई पवार युती शहराध्यक्ष - मोहिनी ओव्हाळ

शहराध्यक्ष - शेख इलियास

युवक माजलगाव शहराध्यक्ष - सलीम खान पठाण

बीड शहर उपाध्यक्ष - शेख ओसामा युवक शहर उपाध्यक्ष - सय्यद जैद या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि भावी सामाजिक कार्यासाठी जिल्हाध्यक्ष शेख रमिज अहेमद यांनी शुभेच्छा दिल्या!

# नॅशनल मराठी विद्यालयात दंतरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन






सोयगांव । दिव्य न्युज

येथील नॅशनल मराठी विद्यालयात गजानन डेंटल क्लिनिक शेंदुर्णी यांच्या वतीने दंतरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी विदयार्थ्यांची मोफत दंत तपसणी करण्यात आली व टूथपेस्ट व ब्रश चे मोफत वाटप करण्यात आले. संपूर्ण शरीराचे उगमस्थान असलेल्या मौखिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, शालेय जीवनापासून आरोग्याबाबत काळजी घेण आवश्यक आहे. तसेच विदयालय राबवित असलेल्या विविध उपक्रमांचे सोयगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे यांनी कौतुक केले. याप्रसंगी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर, डॉ. चैतन्य कासार, डॉ. पूजा कासार, ज्येष्ठ सामाजिक कर्यकर्ते संजय शहापूरकर, कृषिभूषण अरुण सोहनी, नगरसेवक राजू दुतोंडे, नगरसेवक हर्षल काळे, नगरसेवक गजानन कुडके, समाजसेवक विष्णू मापारी, दिगंबर वाघ, दिनेश पंडित, ह.भ.प. सुदनवा केणेकर, आदिसह विद्यालयाचे मुख्याध्यापक अमजद पठाण, प्रगती उर्दू हायस्कुलचे मुख्याध्यापक नदीम खान, पोपटराव साखळे, भाऊसाहेब सिरसाठ, ज्ञानेश्वर पांडव, नितीन पाटील, संतोष पिसे, विजय पाटील, कलीम पठाण, अन्वर खान, शेख रफिक, गजानन खराटे, सुबोध बिचारे, तुकाराम चव्हाण आदी शिक्षक वृंदासह रामेश्वर चौधरी, कदीर देशमुख, शेख जाकीर, इमान पठाण आदी शिक्षेकत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाघोलीकरांनी अनुभवला डॉक्टरांतला 'देवमाणूस'..!

## मजुरी करून पोट भरणाऱ्या महिलेची एकही रुपया न घेता केली प्रसूती

पुणे । दिव्य न्युज

डॉक्टर हे देवाचे दुसरे रुप असतात असं म्हणतात. अनेकांचे प्राण वाचवण्यासाठी ते सतत प्रयत्न करत असतात. कधीही आपल्या कर्तव्यासाठी तत्पर असतात. त्यांच्या प्रयत्नांमुळे कितीतरी नागरिकांना जीवनदान मिळते.माणुसकीचं, डॉक्टरी सेवेचं असं जिवंत उदाहरण पुणे जिल्ह्यात पाहायला मिळालं.वाघोली येथील डॉ.सतीश मेहरे यांनी एका गरीब महिलेची आपल्या दवाखान्यात यशस्वी प्रसूती करत बाळाला व आईला जीवदान दिलंय. आणि तेही एकही रुपया न घेता..!

आशा नावाची महिला, झोपडपट्टीत राहणारी, अत्यंत गरीब परिस्थितीत दिवस काढत होती. नवरा मजुरी करतो, ती स्वतः घरकाम करत असे. सातव्या महिन्यापासून तिला त्रास सुरू झाला होता, पण डॉक्टरांकडे जाणं परवडणं शक्यच नव्हतं. सार्वजनिक रुग्णालयात गर्दी आणि वाट पाहणं ही तिच्या पोटातल्या बाळासाठी धोकादायक ठरू शकत होते.अचानक तिला तीव्र वेदना सुरू झाल्या. परिस्थिती गंभीर होती. शेजारच्यांनी तिचं रडणं ऐकलं आणि लगेच मदतीसाठी पुढे आले. कोणी तरी सांगितलं - डॉ. सतीश मेहेरे यांचा दवाखाना इथून जवळच आहे. ते माणुसकीने वागतात.

आशाताईंना लगेच डॉ. मेहेरे यांच्या दवाखान्यात नेलं. तिथं डॉ. मेहेरे यांनी तपासणी करून समजावलं - बाळ उलटं आहे, आणि तातडीनं शस्त्रक्रिया करावी लागेल. आशाताईंच्या नवऱ्याच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट होती - कारण खिशात पैसेच नव्हते.पण याच क्षणी डॉ. मेहेरे यांनी दिलासा दिला तुमच्याकडे पैसे नसले तरी हरकत नाही. ही केवळ वैद्यकीय जबाबदारी नाही, ही माणूस म्हणून माझी जबाबदारी आहे.

डॉ. मेहेरे आणि त्यांच्या टिमने मोफत प्रसूती केली. औषधे, उपकरणं, सर्जरी



- सर्व काही त्यांच्या खाजगी दवाखान्यातून दिलं. बाळाचा जन्म सुखरूप झाला आणि लक्ष्मीच्या पावलांनी आईने एक गोंडस मुलीला जन्म दिला.

सामाजिक भावनेची जाणीव करून देणारे मेहरे दांम्पत्य..!

खाजगी दवाखाना असला तरी मन मोठं असेल तर तोही जनतेचा दवाखाना होतो. डॉ. सतीश मेहेरे व त्यांच्या पत्नी त्वचारोग तज्ज्ञ पल्लवी मेहरे यांच्यासारखे डॉक्टर्स आजच्या समाजात आशेचा किरण आहेत.गरिबांचे डॉक्टर अशीच या दांम्पत्याची ओळख आहे. आपल्या रुग्णाला कुटुंबाचा भाग समजून उपचार करणाऱ्या या डॉक्टरांस आज वाघोलीकरांकडून सलाम..!

लेकीच्या बापाने मानले डॉक्टरांचे आभार...

अवघ्या काही मिनिटांत डॉक्टर मेहरे आणि स्टाफने सामूहिक प्रयत्न केल्याने वेदनेने विव्हळत असलेल्या महिलेची यशस्वी प्रसूती करत कुठल्याही प्रकारची फी न घेतल्यामुळे मजुरी काम करत असलेल्या पतीच्या अश्रुंचा बांध फुटलेला पहायला मिळाला. याच साश्रू नयनांनी डॉक्टरांना देव मानत बाप झालेल्या पित्याने हॉस्पिटलमधील डॉक्टर मेहरे, नर्स व इतर कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत इयत्ता ३ री ते १० वीच्या प्रस्तावित अभ्यासक्रमावर शिक्षणतज्ञ, शिक्षक आणि पालकांनी आपली मते नोंदवावी -आयटा महाराष्ट्राचे आवाहन

मुंबई । दिव्य न्युज

सन्माननीय शिक्ष कवृंद, पालक, सरंक्षक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व तज्ज्ञ व्यक्तींना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने इयत्ता ३ री ते १० वीच्या शालेय अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT Maharashtra) ने दिनांक २७ जुलै ते २८ ऑगस्ट २०२५ दरम्यान www.maa.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर नव्या अभ्यासक्रमाचे सर्व तपशील झऊऊ स्वरूपात सर्वसामान्यांच्या अभ्यासासाठी अपलोड केले आहेत.

ऑल इंडिया टीचर्स असोसिएशन (आयटा) महाराष्ट्राचे अध्यक्ष मा. अतीक अहमद शेख यांनी सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, पालक व शिक्षणतज्ञांना आवाहन करताना



म्हटले: अभ्यासक्रमातील बदल हे एक गंभीर शैक्षणिक पाऊल आहे, ज्याचा परिणाम आपल्या पुढील पिढ्यांवर होणार आहे. म्हणून हे आपले सामूहिक कर्तव्य आहे की आपण प्रस्तावित अभ्यासक्रम नीट पाहावा, अभ्यासावा आणि कुठेही शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा भाषिक त्रुटी असल्यास त्या स्पष्टपणे वेबसाईटवर नोंदवाव्यात. आयटा महाराष्ट्राचे सचिव मा. पठाण शरीफ खान यांनी स्पष्ट केले की: आयटा महाराष्ट्र केवळ शिक्षकांच्या प्रश्नांसाठीच कार्यरत नाही, तर शिक्षण सुधारणा व धोरणाच्या बाबतीतही नेहमीच एक जागरूक व सन्मान्य भूमिका बजावत आलेला आहे. याच उद्देशाने संघटनेने अलीकडेच एक 'एउडउ (शैक्षणिक अभ्यासक्रम अभ्यास समिती)' स्थापन केली आहे, जी प्रस्तावित अभ्यासक्रमाचे बारकाईने परीक्षण करून आपले शिफारसी थेट शासनापर्यंत पोहोचवेल. हे लक्षात ठेवा की एकदा अभ्यासक्रमास मंजुरी मिळाल्यानंतर त्यात बदल करणे कठीण होईल. म्हणूनच प्रत्येक शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ आणि जागरूक पालकांचे अभिप्राय ही काळाची गरज आहे. म्हणून विनंती करण्यात येते की सर्व उर्दू माध्यम शाळांनी नवीन अभ्यासक्रम डाउनलोड करून त्याचा बारकाईने अभ्यास करावा.

आपली सामूहिक किंवा वैयक्तिक मते ऑनलाईन नोंदवावीत.

# श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप पतसंस्थाने दाखल केलेल्या धनादेश प्रकरणी कर्जदारास न्याय

बीड । दिव्य न्युज

बीड येथील मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी श्रीसाईराम अर्बन मल्टी स्टेट को-ऑप पतसंस्था बँकेने दाखल केलेल्या धनादेश अनादर प्रकरणात कर्जदार आरोपी उज्ज्वल (रहिवासी: बीड, ता. जि. बीड) याची निर्दोष मुक्तता



केली आहे. बँकेने एन.आय. ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत सदर प्रकरणात फिर्याद दाखल केली होती.

आरोपीने व्यवसायासाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. काही कर्ज हप्ते थकल्याने त्याने थकीत रकमेचा धनादेश बँकेस दिला होता. मात्र, हा धनादेश अनादरित झाल्याने बँकेने मा. न्यायालयात फिर्याद दाखल करून प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान, साक्षी-पुरावे आणि आरोपीतर्फे सादर केलेल्या पुराव्यांचा विचार करण्यात आला. तसेच, आरोपीचे वकील ॲड. राहुल एस. वडमारे यांनी कायदेशीर बाबीं न्यायालयासमोर आणल्यामुळे मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी बीड यांनी आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध न झाल्याने त्याची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात ॲड. राहुल एस. वडमारे व ॲड. विशाल बी. वडमारे यांनी आरोपी तर्फे काम केले.



नेकनूर ग्रामपंचायत येथे मोमीनपुरा भागात अंडरग्राउंड नालिचा. काम पूर्ण केल्याबद्दल मोमीपुरा भागातले. सय्यद साजिद अली.( बाबुभाई ) राष्ट्रवादी शरद पवार गट. अध्यक्ष. नेकनूर चे सरपंच सुंदर लांडगे. इजारोदिन जागीरदार. शिवा दादा.आरफात. मुजमील साहेब व इतर खुरेशी समाज. वतीने सत्कार करण्यात आला आहे

# प्रहार जनशक्ती च्या वतीने परभणीत महसुलमंत्री बावनकुळे यांच्या प्रतिमेचे दहन करून केला निषेध

परभणी । दिव्य न्युज : सालेह चाऊस

'शेतकरी कर्जमाफी आंदोलन आणि शेतकर्यांची विविध आंदोलने हे नौटंकी आहेत', असे वक्तव्य महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले होते. या वक्तव्याचा निषेध करत परभणी येथे प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने महसुल मंत्र्यांच्या प्रतिमेला जोडे मारून आणि प्रतिमा दहन करून मंगळवारी (दि.५ ऑगष्ट ) निषेध आंदोलन करण्यात आले.



माजी आमदार बच्चु कडू यांनी महाराष्ट्रात राज्यभर सुरू केलेल्या कर्जमाफी व हमीभाव आंदोलन हे दोन्ही आंदोलने शेतकर्यांच्या हिताची आणि शेतकर्यांच्या हक्काचे आहेत. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा व हमीभाव देण्याचे आश्वासन देणार्या भारतीय जनता पार्टी सरकार त्यांनीच दिलेली आश्वासन विसरले त्याच आश्वासनाची आठवण करून देण्यासाठीच शेतकरी राज्यभर आंदोलन करीत आहेत या आंदोलनाला नौटंकी म्हणून शेतकर्यांच्या भावनांवर मीठ चोळणार्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विरोधामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर नाराजीची लाट असून आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने परभणी येथील उपोषण मैदानात मा.ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रतिमेला जोडे मारून प्रतिमा दहन करून आंदोलन केले. संतप्त झालेल्या आंदोलकांनी बावनकुळे व सरकार विरोधी प्रचंड घोषणाबाजी या वेळी केली. या आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, दिव्यांग आघाडी जिल्हाप्रमुख केशव जाधव, जिल्हा सचिव रामेश्वर पुरी, उपजिल्हाप्रमुख रामेश्वर जाधव, तालुकाप्रमुख उद्धव गरुड, शहर प्रमुख अंकुश गिरी, ऑटो आघाडी शहर प्रमुख शंकर दामोदर, सरचिटणीस वैभव संघई, सर्कल प्रमुख सुरेश आगलावे,हेमराज गरूड, राहुल शिवभगत, रामराज कांगणे, नारायण धुमाळ, रमेश जोंधळे, गोपीनाथ जोंधळे इत्यादी उपस्थित होते. दरम्यान राज्यभरात आजपर्यंत झालेल्या सहा लाख शेतकर्यांच्या आत्महत्या व रस्त्यावर दिसणारा शेतकर्यांचा आक्रोश ही नौटंकी आहे का? असा संतप्त सवाल यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने यांनी उपस्थित केला.

## उपमुख्यमंत्री साहेब झाडे लावणार पण त्याचे संगोपन आणि संरक्षण होणार का? -शेख युनूस

बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यात सात ऑगस्ट रोजी हरित बीड अभियान राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी स्थान या ठिकाणी तीस लाख झाडांची वृक्षारोपण करण्यात येत आहे. वृक्षारोपण हे काळाची गरज आहे. कारण यामुळे अनेक नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षण मिळते. वृक्ष हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड शोषण बाहेर टाकतात. ज्यामुळे हवा शुद्ध राहते त्यामुळे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होते. तसेच वृक्ष पाण्याच्या योग्य व्यवस्थापनात मदत करतात, जसे की पाण्याची पातळी वाढणे,वृक्षारोपण ही काळाची गरज आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकत्रपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. पण जिल्हाधिकारी साहेब यांनी काल बैठकीत सांगितले की ७० टक्के आम्ही झाडाचे रक्षण करू, असे झाले तर बरे आहे साहेब,नाहीतर काही उपयोग नाही.



# आजची ठळक बातमी! लोकप्रिय बीड आकाशवाणीला घरघर! महिन्यांपासून अधिकारीच नाहीत !

### जनमानसामध्ये आदराचे स्थान निर्माण करणाऱ्या बीड आकाशवाणीची परिस्थिती अत्यंत गंभीर अन् दुर्दैवी !

### मुंबई येथील अतिरिक्त महानिदेशक कार्यालयाने कार्यालयाने या गंभीर समस्येकडे पूर्णपणे डोळे झाक केल्याचा गंभीर होतोय आरोप

बीड । दिव्य न्युज

रेडिओ म्हणजे जुन्या काळातील प्रभावी समाज माध्यम म्हणून ओळखलं जायचं. काळाच्या ओघात आता रेडिओ कुठेतरी मागे पडत जातोय की काय अशी परस्थिती निर्माण झाली असतानाच एक मोठी बातमी समोर आली आहे. कधीकाळी सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या बीड आकाशवाणी केंद्रावरून मागील काही दिवसांपासून जुनेच कार्यक्रम प्रसारित करण्यात येत आहेत. कारण या केंद्राला अधिकारीच नसल्याने कार्यक्रम विभागाच्या अनुपस्थितीमुळे जुनेच कार्यक्रम प्रसारित होत असून स्थानिक कलाकारांना मंच मिळत नसल्याची बाब समोर आली आहे. विशेषत: नवनिर्मितीवर ब्रेक लागल्याचे देखील सांगितले जात आहे.




**श्रोत्यांची संख्या कमी झाल्यामुळे व्यावसायिक जाहिरातींना प्रतिसाद नाही!**

● कार्यक्रम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नवीन कार्यक्रम तयार होत नसल्याने जाहिरातदारांची संख्या कमी होत आहे. यामुळे आकाशवाणी केंद्राला मोठा आर्थिक फटका बसण्याची दाट शक्यता आहे. कारण श्रोत्यांची संख्या कमी झाल्यामुळे व्यावसायिक जाहिरातींना फारसा प्रतिसाद मिळत नाही. या परिस्थितीमुळे केंद्राच्या भविष्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

**महत्वाचे मुद्दे**

- १० नोव्हेंबर १९९० रोजी बीड आकाशवाणी केंद्राची स्थापना
- बीडकरांनी प्रेम देऊन मोठे केलेल्या आकाशवाणीला एकूण ३५ वर्ष झाले आहेत
- बीड आकाशवाणी केंद्रातील ऑडियन्स रिसर्च सर्वे नुसार अंदाजे २० लाख श्रोते ऐकत होते.
- पूर्ण वेळ प्रसारण अधिकारी किंवा कार्यक्रम अधिकारी नाहीत

**कायमस्वरूपी कार्यक्रम अधिकारी किंवा प्रसारण अधिकाऱ्यांची नेमणूक नाही!!**

● बीड आकाशवाणी केंद्रावर मागील अनेक महिन्यांपासून कायमस्वरूपी कार्यक्रम अधिकारी किंवा प्रसारण अधिकाऱ्यांची नेमणूक झालेली नाही. यामुळे एकेकाळी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्याने जनमानसात आदराचे स्थान निर्माण करणाऱ्या आकाशवाणीची परिस्थिती अत्यंत खेदजनक झाली आहे. मुंबई येथील अतिरिक्त महानिदेशक कार्यालयाने या गंभीर समस्येकडे पूर्णपणे डोळेझाक केल्याचा गंभीर आरोप होत आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नवीन कार्यक्रमांची निर्मिती पूर्णपणे ठप्प!**

● बीड आकाशवाणी केंद्रावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नवीन कार्यक्रमांची निर्मिती पूर्णपणे ठप्प झाली आहे. केंद्रावर फक्त जुनेच कार्यक्रम पुन्हा पुन्हा प्रसारित केले जात आहेत, ज्यामुळे श्रोत्यांमध्ये कंटाळा येत असून आकाशवाणीची लोकप्रियता घटत चालली आहे. या अक्षम्य दुर्लक्षामुळे बीड जिल्ह्यातील आकाशवाणी केंद्र आता केवळ नावाने कार्यरत असल्याचे चित्र आहे.

**दिरंगाईसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाईची अपेक्षा!**

● मुंबई येथील अतिरिक्त महानिदेशक कार्यालयाने या दिरंगाईसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची खात्री करावी. बीड जिल्ह्यातील आकाशवाणी केंद्राची सध्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे.

● आणि या केंद्रावर तातडीने योग्य अधिकाऱ्यांची नेमणूक करून स्थानिक कार्यक्रमांची निर्मिती पुन्हा सुरू केल्यास आकाशवाणी पुन्हा एकदा 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्याला न्याय देऊ शकेल आणि बीड जिल्ह्यातील सांस्कृतिक जीवनात आपले महत्त्वाचे योगदान कायम राखू शकेल.

**स्थानिक प्रतिभावंतांना कौशल्य सादर करण्यासाठी कोणतेही व्यासपीठ नाही!**


● कार्यक्रम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील स्थानिक कलाकार, गायक, वक्ते आणि प्रतिभावंतांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी कोणतेही व्यासपीठ मिळत नाही. यामुळे स्थानिक संस्कृतीला मोठा धक्का बसत आहे आणि अनेक तरुण कलाकार निराश होत आहेत.

● आकाशवाणीचा मूळ उद्देश स्थानिक संस्कृती, भाषा आणि कलाकारांना प्रोत्साहन देणे हा असतो, परंतु या उद्देशाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्यामुळे बीड जिल्ह्यातील सांस्कृतिक जीवनावर नकारात्मक परिणाम होत आहे. बीड आकाशवाणी केंद्राची परिस्थिती सुधारण्यासाठी तातडीने कायमस्वरूपी कार्यक्रम अधिकारी आणि प्रसारण अधिकाऱ्यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. यामुळे नवीन कार्यक्रमांची निर्मिती पुन्हा सुरू होऊन स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळू शकेल. तसेच नवनियुक्त अधिकाऱ्यांनी बीड जिल्ह्यातील स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन कार्यक्रमांची मालिका सुरू करावी.

## शिपाई ते सहाय्यक महसूल अधिकारी; शेख बाबर यांची कौतुकास्पद कामगिरी-एस.एम.युसूफ़

बीड । दिव्य न्युज

जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील पारगाव घुमरा येथील रहिवासी असलेले शेख बाबर यांनी शिपाई पदापासून केलेली सुरुवात त्यांच्यातील कर्तव्यदक्षतेमुळे त्यांना सहाय्यक महसूल अधिकारी पदापर्यंत घेऊन गेली आहे. त्यांची ही कामगिरी कौतुकास्पद असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे.



शेख बाबर महेबूब यांचा आतापर्यंत महसूल विभागाचे कनिष्ठ कर्मचारी ते सहाय्यक महसूल अधिकारी असा प्रवास झालेला आहे. ते मूळचे पारगाव घुमराचे रहिवासी आहेत. त्यांची सन २०१२ साली चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून प्रथम आष्टी तहसील कार्यालयात नियुक्ती झाली होती. त्यांच्यात असलेल्या कर्तव्यतत्परतेमुळे त्यांना अवघ्या चारच वर्षात म्हणजे २०१६ साली लिपिक म्हणून बढती मिळाली. या पदावर ही त्यांनी चमकदार कामगिरी केल्यामुळे पाटोदा उपविभागीय कार्यालयात कार्यरत असताना २०२३ साली सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून त्यांना पदोन्नती मिळाली. उपविभागीय कार्यालयात कार्यरत असताना प्रशासकीय कामकाज करताना त्यांनी सतत समाजसेवी भावनेतून कर्तव्य बजावले. सतत झोकून देऊन काम करण्याची वृत्ती यामुळे त्यांच्या कामाची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली आणि २०२४-२५ या वर्षासाठी उत्कृष्ट काम केले म्हणून जिल्हाधिकारी यांनी त्यांना सन्मानित केले. तसेच उपविभागीय अधिकारी शेख वसीमा तहसीलदार यांनीही त्यांचा यथोचित सन्मान केला. अशाप्रकारे आपल्या बीड जिल्ह्याच्या भूमिपुत्राने शासकीय कार्यालयात शिपायापासून ते अधिकारी होण्यापर्यंत मारलेली मजल आणि त्यांचा जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी केलेला सन्मान कौतुकास्पद असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम



लासूर । दिव्य न्युज : रमेश नेटके

लासूरगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज माहाराजस्व अभियाना आतर्गत वृक्ष लागवड ई पीक पाहणी ग्रीस्ट्रॅक आशा विवध योजनेच्या माहिती साठी महसूल सप्ताह मध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम रराबविण्यात आले यावेळी येथे ग्रामस्थ शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

यावेळी देवीला दाक्षयनी मंदिरातील सभागृहामध्ये शेतकरी व ग्रामस्थ यांना उपविभागीय अधिकारी आरून जाऱ्हाड व तहसीलदार सुनील सावंत यांनी मासुल सप्ताह अंतर्गत शेतकऱ्यांना शेतीविषयक पाणंद रस्ते व विमा योजने ची सविस्तर माहिती देण्यात आली व गावात जाऊन समस्या नागरिकांच्या जाणून घेतल्या जातात यावेळी महसूल कर्मचारी तलाठी पोलीस पाटील आदींना प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी याठिकाणी यावेळी मंडलाधिकारी रीता पुरी, ग्रामविकास अधिकारी नानासाहेब राहिंज,सरपंच नंदा हूमे,पोलीस पाटील बाबासाहेब हरिश्चंद्रे,महसूल कर्मचारी अशोक नळे , तलाठी प्रवीण पाटील, पोलीस पाटील राजू मोडके,कारभारी निघोटे, विकास भंडारी, अनिल कानडी, राधिका जाधव, अक्षय सव्वालाखे, कर्मचारी व गावातील रणजित देशमुख ,राजू श्रीखंडे दीपक ह ह हरिश्चंद्र, शेतकरी व ग्रामस्थांची उपस्थिती होती

## इंजि.इफ्तिकार अहमद खान यांचे निधन

बीड । दिव्य न्युज

शहरातील शहिशांह नगर भागातील रहिवाशी असलेले इफ्तिकार अहमद खान, वय ६० वर्ष, राहणार न्यू शहेनशहा नगर बीड, सेवानिवृत्त अभियंता जि.प पाणीपुरवठा बीड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी दु:खत निधन झाले आहे त्यांचा अंत्यविधी तकिया मस्जिद कब्रस्तान बीड येथे रात्री बारा वाजता पार पडला त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक विवाहित मुलगी व नातू असा परिवार आहे. दफनविधीमध्ये मित्र परिवारसह अनेकांची उपस्थती होती अचानकपणे झालेले निधनामुळे धक्का बसला खान परिवारावर कोसळलेल्या दु:खात कश्मकश दिव्यवार्ता परिवार सहभागी आहे.





बीड नगरपालिकेचे नवनिर्वाचित मुख्याधिकारी शैलेश फडसे साहेब यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला त्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मा. सभापति हाफ़िज़ अशफाक, वंचित बहुजन आघाड़ी चे जि. उपाध्यक्ष अनवर पाशा, हाजी अय्यूब पठान, समाज सेवक मुफ्ती अब्दुल वाजिद अशरफी, शेख़ चांद

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ दोन महिन्यांचे पगार जिल्हा परिषदेने थकवले

> "ग्रामपंचायत कर्मचारी हे शेतकऱ्यांचेच लेकरं आहेत त्यांना जर दोन महिन्यांची वेतन देण्यासाठी चार महिने लागत असतील तर ही गंभीर बाब आहे आम्हाला रस्त्यावर उतरून या कर्मचारी बांधवांना न्याय देण्यासाठी एक लढा उभरावा लागेल.
>
> – जगदीश फरताडे शेतकरी नेते, वडवणी

वडवणी । दिव्य न्युज(शेख शरीफ)

बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यास जिल्हा परिषदेकडून टाळाटाळ केली जात असल्याने ग्रामपंचात कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे महाराष्ट्र शासनाकडून एप्रिल आणी मे महिन्याचे वेतन जिल्हा परिषद कडे वर्ग करण्यात आलेले असता देखील जिल्हा परिषदेच्या उदासीनतेमुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे

वडवणी तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये पाणी पुरवठा कर्मचारी, शिपाई असे ५८ कर्मचारी काम करतात महाराष्ट्र शासनाकडून या कर्मचाऱ्यांचे एप्रिल व मे महिन्यांचे वेतन जून मधेच जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेले आहे मात्र तेथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उदासीनतेमुळे त्यांनी पंचायत समितीला वर्ग केलेले नाहीत परिणामी आज चार महिने झाले कर्मचाऱ्यांवर व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे जिल्हा परिषदेने पंचायत समितीला वेतन वर्ग केल्यानंतर देखील पुन्हा पंचायत समितीकडून असचं कर्मचाऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार होतं असल्याने कर्मचारी वैतागले असून हा प्रकार थांबून वेळेवर वेतन करण्याची मागणी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून होतं आहे लवकरात लवकर वेतन ण झाल्यास आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०